दैनिक

# महाराष्ट्र जीत

मुख्य सपादक सागर राणा अभोरे    सपादक बडूभाऊ इगोले

RNI No - MHMUL/25/A0788

वाशीम ■ बुधवार दि. 13 ऑगस्ट 2025 ■ वर्ष : 2 ले ■ अंक : 94 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रुपये ■ Title code:- MAHMUL03935

## बेरिस्ता ग्रामपंचायत 9 ऑगस्ट जागतिक आदिवासी दिन कळंमपाडा ग्रामस्थ ढोलनाच घेऊन उस्फूर्तीत साजरा.

**मोखाडा : अमोल टोपले**

9 ऑगस्ट हा जागतिक आदिवासी दिन संपूर्ण जगात मोठ्या जल्लोषात साजरा होतो. आदिवासी बांधवांची जीवनशैली व त्यांची ओळख दर्शवणारा पारंपरिक पेहराव वेशभूषा संस्कृतीचा वेगळेपणा जपणारा उत्सव तसेच निसर्गावर अत्यतुल्य प्रेम जल जंगल जमिनीवरील निष्ठा मानवतेवरील प्रेम श्रद्धा निष्ठेने हा उत्सव साजरा होतो याच निष्ठेने मोखाडा तालुक्यातील बेरिस्ता येथे मोठ्या जल्लोषात हा उत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमात शेकडो आदिवासी बांधवांनी एकजुटीचे दर्शन दाखवले यावेळी रॅली काढण्यात आली आणि बेरिस्ता ग्रामपंचायत मधील कळंमपाडा येथील ग्रामस्थानी उत्कृष्ट पद्धतीने ढोलनाच सादर करत कार्यक्रमाला शोभा आणली डीजे संबळ तुतारी तारपा वाद्यावर पारंपारिक नृत्य करत संबंध परिसरात जय आदिवासी जय जोहार घोषणांचा जयजयकर ऐकवयास मिळाला काळंपाडा येथील ढोलणाच ताफ्याच स्वागत माजी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी केला.



# आधार, पॅन बाळगले म्हणून कुणी भारतीय ठरत नाही

## बांगलादेशी नागरिकाचे १० वर्षे वास्तव्य, जामीन नाकारला



**मुंबई** : केवळ आधार कार्ड, पॅन कार्ड किंवा मतदान ओळखपत्र बाळगल्याने एखादी व्यक्ती भारताची नागरिक ठरत नाही, असे स्पष्ट करीत उच्च न्यायालयाने बांगलादेशातून बेकायदा मार्गाने आलेल्या व्यक्तीची जामिनावर सुटका करण्यास मंगळवारी नकार दिला. संबंधित व्यक्तीवर बनावट कागदपत्रांच्या आधारे एक दशक भारतात वास्तव्य केल्याचा आरोप आहे.

नागरिकत्व कायद्यातील तरतुदींमध्ये भारताचा नागरिक कोण असू शकतो आणि नागरिकत्व कसे मिळवता येते? हे नमूद केले आहे. आधार कार्ड, पॅन कार्ड किंवा मतदार ओळखपत्र ही कागदपत्रे केवळ ओळख पटविण्यासाठी आहेत आणि सेवा मिळविण्याकरिता आहेत, न्या. अमित बोरकर यांच्या एकलपीठाने स्पष्ट केले. आरोपीवरील आरोप गंभीर आहेत. त्याने केवळ भारतात जास्त काळ वास्तव्य केले नाही तर भारतीय असल्याचे भासविण्यासाठी बनावट ओळखपत्रे बनविली आणि ती वापरली, असे न्यायालयाने त्याचा जामीन फेटाळताना म्हटले.

**आरोप काय ?**

बाबू अब्दुल रौफ सरदार हा बांगलादेशी नागरिक भारतात बेकायदा मार्गाने घुसला. त्याच्याकडे पासपोर्ट किंवा टॅव्हल व्हिसा नव्हता. त्याने फसवणूक करून आधार कार्ड, पॅन कार्ड आणि मतदान ओळखपत्र मिळविले, असा आरोप आहे.

**नागरिकत्व कायदा काय म्हणतो?**

'एखाद्याच्या नागरिकत्त्वाबाबत निर्णय घेण्यासाठी 'नागरिकत्व कायदा - १९५५' हा मुख्य कायदा आहे. तो अधिकृत नागरिक आणि स्थलांतरीत यांच्यातील फरक स्पष्ट करतो. हा फरकच महत्त्वाचा आहे. कारण तो देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करतो. अधिकृत नागरिकांना मिळणारे फायदे आणि त्यांचे अधिकार बेकायदा लोक हिरावून घेणार नाहीत, याची हमी हा कायदा देतो, असे न्यायालयाने नमूद केले.

**आरोपी म्हणतो, मी भारतीयच**


"मी भारताचा प्रामाणिक नागरिक आहे. मी बांगलादेशाचा नागरिक आहे, हे सिद्ध करण्यासाठी तपासयंत्रणेकडे कोणतेही निर्णायक पुरावे नाहीत. सर्व कागदपत्रे, आयकर नोंदी आणि व्यवसाय नोंदीशी जोडलेली आहेत. मी २०१३पासून ठाणे जिल्ह्यात राहतो, असा युक्तिवाद आरोपीच्या वकिलाने केला. तो न्यायालयाने अमान्य केला.

## कर्जत तालुक्यात ड्रग्ज निर्मितीचा कारखाना उद्ध्वस्त

**पाच जण ताब्यात**

**कर्जत** : कर्जत तालुक्याच्या दुर्गम पाथरज ग्रामपंचायतीतील ताडवाडी येथे बंद घरात सुरू असलेला ड्रग्ज निर्मितीचा कारखाना नेरळ पोलिसांनी ग्रामस्थांच्या मदतीने उद्ध्वस्त केला. या प्रकरणी पाच जणांना ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू आहे.

ताडवाडीमधील एका आदिवासी व्यक्तीचे घर मुंबईतील धारावी परिसरातील चार-पाच जणांनी भाड्याने घेतले होते. मध्यरात्री त्या घराजवळ ब्रेझा कार आल्याने ग्रामस्थांनी संशय व्यक्त केला. रात्री दोनच्या सुमारास ग्रामस्थांनी



माळरानावरील त्या घराकडे जाऊन पाहणी केली असता, घरात पाच जण वेगवेगळ्या डब्यांमध्ये द्रव्ये मिसळत असल्याचे दिसून आले. या द्रव्यांना उग्र वास येत असल्याने ग्रामस्थांनी त्यांना विचारणा केली असता त्यांनी अरेरावीची भाषा केली.

प्रसंग संशयास्पद वाटल्याने ग्रामस्थांनी पाचही जणांना पकडून बेदम मारहाण केली. त्यानंतर याबाबतची माहिती पोलिसांना दिल्यानंतर मध्यरात्री तीनच्या सुमारास पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे घटनास्थळी पोहोचले. तेथे बर्फाच्या लाद्या आणि रसायने पाहून हा ड्रग्ज तयार करण्याचा प्रकार असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी पंचनामा करून नशिले पदार्थ बनविण्याचा कारखाना उद्ध्वस्त केला. ताब्यात घेतलेल्या आरोपींपैकी एकाने फार्मसी डिप्लोमा केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पुढील तपास नेरळ पोलीस करीत आहेत.

## बिअरच्या ट्रकला कंटेनरची धडक

**नागरिकांनी केली बाटल्यांची यथेच्छ लूट, चालक जखमी**

**कराड** : येथून जात असलेल्या राष्ट्रीय महामार्गावर उभ्या मालट्रकला कंटेनरने पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातात कंटेनरचालक जखमी झाला तर मालासह वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. पुणे-बंगळुरू आशियाई महामार्गावर नांदलापूर, ता. कराड गावच्या हद्दीत मंगळवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला.

दरम्यान, अपघातग्रस्त मालट्रकमध्ये बिअरच्या बाटल्यांचे बॉक्स होते. अपघातानंतर बिअरच्या बाटल्या रस्त्यावर पडल्या. या बाटल्या नेण्यासाठी अनेकांनी त्याठिकाणी धाव घेत शेकडो बाटल्या यावेळी पळविण्यात आल्या. अपघातानंतर महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

भिवंडीहून बिअरचे बॉक्स घेऊन मालट्रक कोल्हापूरच्या दिशेने जात होता. पुणे-बंगळुरू महामार्गावर नांदलापूर गावच्या हद्दीत ट्रक आला असता, चालकाने ट्रक महामार्गाकडेला थांबवला. त्याचवेळी पाठीमागून कोल्हापूरच्या दिशेने निघालेल्या भरधाव कंटेनरचालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने ट्रकला पाठीमागून



जोरदार धडक झाली. या धडकेत ट्रक महामार्गावरच आडवा झाला. ट्रकमधील बिअरच्या बाटल्या भरलेले बॉक्स महामार्गावर पडल्याने फुटून काचांचा खच पसरला होता. या अपघातात कंटेनरचालक जखमी झाला आहे. मात्र अपघातानंतर नागरिकांनी बिअरच्या बाटल्या पळवल्या.

## पाणीपुरवठा बंद

**कल्याण** : अतितातडीच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी बुधवार, १३ ऑगस्ट रोजी दुपारी १.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत मोहीली येथून पाणीपुरवठा बंद राहील.

या कालावधीत नेतीवली जलशुद्धीकरण केंद्रावरून डोंबिवली (पूर्व व पश्चिम) विभागाला होणारा पाणीपुरवठा पूर्णतः बंद राहणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पाणी जपून वापरावे व आधीच पाणीसाठा करून ठेवावा, अशी विनंती महापालिकेकडून करण्यात आली आहे. दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठा पूर्ववत सुरू केला जाईल. पाणीपुरवठा सुरू होण्यात थोडा विलंब होऊ शकतो.

## जमावाच्या मारहाणीत तरुणाचा मृत्यू

**जळगाव** : जामनेर येथे पोलीस भरतीचा अर्ज भरण्यासाठी आलेल्या बेटावद खुर्द येथील सुलेमान रहिमखान पठाण (२१) या तरुणाला संशयावरून काही तरुणांनी बेदम मारहाण केली. घरी परतल्यानंतर त्याचा मृत्यू झाला. सोमवारी दुपारी घडलेल्या या घटनेनंतर जामनेरमध्ये तणाव निर्माण झाला. पोलीस तपासात दहा संशयितांची नावे समोर आली असून, त्यापैकी दोघांना ताब्यात घेण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

सुलेमान पठाण हा बारावी उत्तीर्ण असून पोलीस भरतीची तयारी करत होता. सोमवारी तो अर्ज दाखल करण्यासाठी जामनेरला आला होता. एका कॅफेत बसला असताना काही तरुणांनी त्याला बाहेर खेचत मारहाण करण्यास सुरुवात केली. बस स्थानकातही त्याला मारहाण झाल्याचे सांगितले जाते.

घरी बेटावद खुर्दला परतल्यावर त्याने पालकांना घटना सांगितली, पण काही वेळातच तो कोसळला. तातडीने जामनेर उपजिल्हा रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेनंतर एका समुदायाने जामनेर पोलीस ठाण्यासमोर ठिय्या मांडल्याने काही काळ तणाव निर्माण झाला. पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांनी घटनास्थळी जाऊन जमाव शांत केला. सुलेमानच्या मृत्यूप्रकरणी वडील रहीमखान पठाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, संशयितांपैकी दोघांना ताब्यात घेतले आहे.

## २५४ कोटींचा घनकचरा व्यवस्थापन प्रस्ताव केंद्राकडे

**इचलकरंजी** : स्वच्छ भारत मिशन २.० अंतर्गत इचलकरंजीतील घनकचरा व्यवस्थापन यंत्रणा बळकट करण्यासाठी तब्बल ₹२५४ कोटींचा वित्तीय प्रस्ताव केंद्र सरकारचे गृहनिर्माण व नागरी कार्य मंत्री मनोहर लाल खट्टर यांना सादर केल्याची माहिती खासदार धैर्यशील माने यांनी दिली.

प्रस्तावानुसार, इचलकरंजीला महानगरपालिकेचा दर्जा मिळाल्याने सक्षम पायाभूत सुविधा, आधुनिक तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक पद्धतीने कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याचा महापालिकेचा संकल्प आहे. यामध्ये १०० टीपीडी बायो-सीएनजी प्रकल्प, ५० टीपीडी ऑप्टिकल सॉर्टिंग एमआरएफ,



> "कचरा-मुक्त शहर हा उपक्रम राबवून इचलकरंजीला स्वच्छ सर्वेक्षणात अव्वल स्थान मिळवता येईल तसेच आरोग्य, पर्यावरण व नागरिकांच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा होईल."
> – **धैर्यशील माने**, खासदार

बांधकाम व पाडकाम कचरा प्रक्रिया केंद्र, वस्त्रोद्योग व धोकादायक कचरा व्यवस्थापन, इलेक्ट्रिक वाहनाद्वारे घर-घर कचरा संकलन, प्रत्यक्ष वेळेतील डिजिटल मॉनिटरिंग, जनजागृती मोहिमा, विकेंद्रित कंपोस्टिंग आणि शहर सौंदर्यीकरण यांचा समावेश आहे.

निधी उभारणीसाठी केंद्र व राज्य सरकारचे सहकार्य, १५ वा वित्त आयोगाचे अनुदान, पीपीपी पद्धतीने गुंतवणूक आणि कार्बन क्रेडिट महसूलाचा वापर करण्याची योजना आहे. यामुळे १००% स्त्रोतावर कचरा विभागणी, सर्व कचऱ्याची वैज्ञानिक प्रक्रिया, पुनर्वापरातून महसूल, आणि "कचरा-मुक्त शहर" दर्जा मिळवण्याचे उद्दिष्ट महापालिकेने ठेवले आहे.

## भिवंडीत भाजप नेत्यासह चुलत भावाची हत्या

**१२ जणांवर गुन्हा दाखल**

**भिवंडी** : भाजपच्या युवा नेत्यासह त्याच्या चुलत भावाची कार्यालयाबाहेरच निर्घृणपणे हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना भिवंडीत तालुक्यातील खारबाव चिंचोटी रस्त्यावरील खार्डी गावातील कार्यालयाबाहेर घडली आहे. याप्रकरणी भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात १२ हल्लेखोरांविरोधात दुहेरी हत्याकांडाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रफुल्ल तांगडी, (४२ ) आणि तेजस तांगडी (२२) अशी हत्या झालेल्या युवकांची नावे असून मृतक प्रफुल्ल हे भाजप युवा मोर्चा ठाणे ग्रामीण जिल्हा उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. तर विकी भरत म्हात्रे, कल्पेश रामदास वैती, अजय सुरेश तांगडी, महेंद्र नामदेव तांगडी, व्यानंद नामदेव तांगडी, सुनिल सुभाष भोईर, प्रसाद गजानन तांगडी, मोहन बाळकृष्ण तांगडी, नऊस नरेश नांदुरकर व विजय एकनाथ मुकादम, रवींद्र एकनाथ मुकादम, जितेश मधुसुदन गवळी अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रफुल्लचे याच गावात मुख्य रस्त्यावर जे.डी. टी. इंटरप्रायझेस नावाचे व्यावसायिक कार्यालय आहे. याच कार्यालयातून प्रफुल्ल आणि तेजस हे दोघेही घरी जाण्यास निघाले असता धारधार शस्त्र हातात असलेल्या चार ते पाच हल्लेखोरांनी दोघांवर सपासप वार केले.

# प्रत्यक्ष कर संकलनात सुमारे ४ टक्के घसरण

## मोठ्या प्रमाणावरील परताव्याचा परिणाम

**नवी दिल्ली** : या आर्थिक वर्षात आतापर्यंत निव्वळ प्रत्यक्ष कर संकलन ३.९५ टक्क्यांनी घसरून ६.६४ लाख कोटी रुपये झाले आहे. मुख्यतः मोठ्या प्रमाणावरील परताव्याचा हा परिणाम असल्याचे मंगळवारी जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीत दिसून आले. कंपन्या, व्यक्ती आणि व्यावसायिक आणि इतर संस्थांनी भरलेल्या उत्पन्नावरील कर प्रत्यक्ष करात समाविष्ट आहेत.

निव्वळ कॉर्पोरेट कर संकलन सुमारे २.२९ लाख कोटी रुपये झाले, तर बिगर-कॉर्पोरेट करात (ज्यामध्ये व्यक्ती, हिंदू अविभाजित कुटुंबे (एचयूएफ)




### चालू आर्थिक वर्षात प्रत्यक्ष कर ६.६४ लाख कोटींवर

आणि कंपन्या यांचा समावेश असून ते ४.१२ लाख कोटी रुपये झाले. १ एप्रिल ते ११ ऑगस्टदरम्यान सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स (एसटीटी) संकलन २२,३६२ कोटी रुपये होते.

एकूण निव्वळ संकलन सुमारे ६.६४ लाख कोटी रुपये होते, जे गेल्या आर्थिक वर्षात (२०२४-२५) याच कालावधीत जमा झालेल्या ६.९१ लाख कोटी रुपयांपेक्षा ३.९५ टक्के कमी आहे. या आर्थिक वर्षात आतापर्यंत जारी केलेले परतावे १० टक्क्यांनी वाढून १.३५ लाख कोटी रुपये झाले आहेत.

१ एप्रिल ते ११ ऑगस्टदरम्यान एकूण कर संकलन (परताव्यापूर्वी) ७.९९ लाख कोटी रुपये होते, जे मागील वर्षीच्या याच कालावधीतील ८.१४ लाख कोटी रुपयांपेक्षा १.८७ टक्क्यांनी कमी आहे.

### चालू आर्थिक वर्षात २५.२० लाख कोटी संकलनाचा अंदाज

चालू आर्थिक वर्षात (२०२५-२६) सरकारने प्रत्यक्ष कर संकलन २५.२० लाख कोटी रुपये होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे, जो मागील वर्षाच्या तुलनेत १२.७ टक्क्यांनी जास्त आहे. आर्थिक वर्ष २६ मध्ये एसटीटीमधून ७८,००० कोटी रुपये गोळा करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.

## सोने हजाराने, चांदी दोन हजारांनी स्वस्त

**नवी दिल्ली** : जागतिक बाजारात विक्रीच्या माऱ्यामुळे मंगळवारी राजधानी दिल्लीत सोन्याचा भाव १,००० रुपयांनी घसरून १,०१,५२० रुपये प्रति १० ग्रॅम झाला, असे ऑल इंडिया सराफा असोसिएशनने म्हटले आहे.

सोमवारी, ९९.९ टक्के शुद्ध मौल्यवान धातूचा भाव १,०२,५२० रुपये प्रति १० ग्रॅम झाला. स्थानिक बाजारात, ९९.५ टक्के शुद्ध सोन्याचा भाव मंगळवारी १,००० रुपयांनी घसरून १,०१,१०० रुपये (सर्व करांसह) प्रति १० ग्रॅम झाला.

दरम्यान, चांदीच्या भावात मंगळवारी २,००० रुपयांनी घसरण होऊन १,१२,००० रुपये प्रति किलो (सर्व करांसह) झाला. सोमवारी तो १,१४,००० रुपये प्रति किलो झाला. जागतिक पातळीवर, न्यू यॉर्कमध्ये स्पॉट गोल्डचा भाव ०.१३ टक्क्यांनी वाढून ३,३४७.१८ डॉलर प्रति औंस झाला.

## किरकोळ महागाईचा ८ वर्षांचा नीचांक

### जुलैमध्ये १.५५ टक्क्यांपर्यंत घसरली



**नवी दिल्ली** : भाज्या आणि धान्यांसह अन्नधान्यांच्या किमती कमी झाल्यामुळे जुलैमध्ये किरकोळ महागाई ८ वर्षांच्या नीचांकी १.५५ टक्क्यांवर घसरल्याचे मंगळवारी जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीनुसार स्पष्ट झाले. जुलैमध्ये वार्षिक आधारावर अन्न महागाई दर (-) १.७६ टक्के राहिला.

जूनमध्ये ग्राहक किंमत निर्देशांक (सीपीआय) आधारित महागाई २.१ टक्के आणि जुलै २०२४ मध्ये ३.६ टक्के होती. जुलै २०२५ मधील महागाई जून २०१७ नंतरची सर्वात कमी आहे जेव्हा ती १.४६ टक्के होती.

जुलै २०२५ मध्ये मुख्य महागाई आणि अन्नधान्याच्या महागाईत लक्षणीय घट मुख्यतः अनुकूल आधारभूत परिणाम आणि डाळी आणि उत्पादने, वाहतूक आणि दळणवळण, भाज्या, धान्य आणि उत्पादने, शिक्षण, अंडी आणि साखर आणि मिठाई यांच्या महागाईत घट झाल्यामुळे झाली आहे, असे राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) म्हटले आहे.

## संपादकीय

### हिमालयाच्या पायथ्याचे अख्खे गाव जेव्हा गाडले जाते...

५ ऑगस्ट २०२५. अचानक आलेल्या पुरामुळे आणि भूस्खलनामुळे उत्तराखंडमधील एक अख्खे गाव चिखलाखाली गाडले गेले. भर पावसाळ्यात झालेल्या विध्वंसक दुर्घटनेमुळे पुन्हा एकदा हे राज्य प्रकाशझोतात आले. यावर्षी मोसमी पावसाचे आगमन लवकर झाले. जूनपासूनच देशभर भरपूर पाऊस पडतो आहे. जागतिक तापमानवाढीमुळे महासागरांच्या पृष्ठभागाचे तापमान वाढले आहे आणि याचा मोसमी पावसावर थेट परिणाम झालेला आहे. याच तापमानवाढीमुळे हिमालयातील हिमनद्या वितळत आहेत, त्यामुळे हिमशिखरांवर बर्फाच्या जागी पाण्याची तळी आहेत. अशा परिसरात अतिवृष्टी किंवा ढगफुटी झाली तर तळ्याच्या बर्फाच्या भिंतींना खिंडारे पडतात. अचानक पाणी, बर्फाचे मोठे तुकडे आणि ठिसूळ असलेल्या हिमालयाच्या पृष्ठभागावरील दगड, माती, असा सगळा प्रवाह वाढत वाढत शिखराकडून पायथ्याकडे झेपावतो. गेली काही वर्षे हिमालयाच्या पायथ्याच्या संपूर्णच पट्ट्यामध्ये दरवर्षी पावसाळ्यात अचानक पूर येण्याच्या घटना घडत आहेत. कुठे ना कुठे गावे गाडली जाणे, रस्ते व पूल वाहून जाणे, जलविद्युत केंद्रांची पडझड होणे, असे विध्वंसक परिणाम झाले आहेत, मोठ्या संख्येने मृत्यूही झाले आहेत. पण म्हणून जागतिक तापमानवाढ या अस्मानी संकटाला दोष देऊन शासकीय यंत्रणेने स्वस्थ बसावे का? अशा दुर्घटना आता होणारच, माणसे मरणारच, नुकसान होणारच, हे नागरिकांनी स्वीकारून टाकायचे का? जागतिक तापमानवाढीमुळे जगभरातच नैसर्गिक आपत्तींची वारंवारता, तीव्रता वाढलेली आहे आणि भविष्यात वाढत जाणार आहे, हा इशारा हवामानतज्ज्ञ या शतकाच्या सुरुवातीपासूनच देत आले आहेत. त्यामुळे आज २०२५ मध्ये अशा आपत्तीला कारणीभूत असलेली स्थानिक हवामानाची स्थिती 'अभूतपूर्व' असली, तरी 'अनपेक्षित' निश्चितच नाही. स्थानिक हवामानात नेहमीपेक्षा काही वेगळे घडते आहे, एवढ्या एका कारणामुळे मोठी वाताहात होणे अपरिहार्य निश्चितच नसते. संभाव्य आघाताला तोंड देण्याच्या उपाययोजना आधीच केल्या असतील तर मोठे नुकसान व जीवितहानी टाळता येऊ शकते. १९९९ मध्ये ओडिशाच्या किनारपट्टीवर एक महाशक्तिशाली चक्रीवादळ येऊन आदळले आणि त्याने जवळजवळ १० हजार लोकांचे प्राण घेतले. पण तत्कालीन राज्य शासनाने या संकटातून धडा घेतला आणि आपत्ती व्यवस्थापनाची मजबूत यंत्रणा उभी केली. २०१३ मध्ये पुन्हा एकदा ओडिशावर १९९९ नंतरचे सर्वात मोठे चक्रीवादळ येऊन आदळले. पण त्यावेळी जवळजवळ १० लाख लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आणि मनुष्यहानी टाळली गेली. २०१० च्या दशकापासून भारताच्या पूर्व किनारपट्टीवर चक्रीवादळांचे प्रमाण व तीव्रता वाढत चाललेली आहे. सातत्याने मोठी चक्रीवादळे येऊनही ओडिशात फार मोठी जीवितहानी झालेली नाही. राज्यांमध्ये याच धर्तीवर आपत्तीव्यवस्थापन करण्याची गरज आहे. पूर येण्याची शक्यता कुठे आहे, याचा अभ्यास करून कोठे कोणती बांधकामे व विकासकामे होऊ द्यायची याचे वैज्ञानिक निकष लावायला हवेत. मुळात ठिसूळ आणि भूकंपप्रवण असलेल्या हिमालयात जागतिक तापमानवाढीमुळे ढगफुटी आणि हिमनद्यांची फूट अशी नवी संकटे आली आहेत. अशा ठिकाणी काय व किती बांधावे व बांधू नये, याची आचारसंहिता बनवणे, नद्यांच्या पात्रांना व पूरक्षेत्रांना त्यांची जागा देणे व त्यांच्याशी छेडछाड न करणे आवश्यक आहे. धार्मिक आणि साहसी पर्यटनासाठीच्या सोयीसुविधा उभ्या करणे ही उत्तराखंडची आर्थिक गरज असली, तरी सुरक्षिततेला प्राधान्य देऊन काही बंधने घालावी लागतील, आणि राजकीय दबाव येऊ न देता किंवा भ्रष्टाचार होऊ न देता ती काटेकोरपणे पाळावी लागतील. आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यासाठी, लोकांना कमी वेळात व गोंधळ होऊ न देता सुरक्षित स्थळी हलवण्यासाठी, दुर्घटनेनंतरच्या बचावकार्यासाठी लागणारी प्रभावी यंत्रणा उभी करावी लागेल. हिमशिखरांवरच्या तळ्यांवर आणि नद्यांच्या पात्रांवर नजर ठेवणे, पावसाचे अंदाज आणि या तळ्यांची सद्यस्थिती यांचा एकत्रित विचार करून संकटांची संभाव्यता काढणे व पूर्वसूचना शक्य तितक्या लवकर सर्वांपर्यंत पोहचेल, अशी यंत्रणा उभी करणे, नवी बांधकामे व विकासकामे वैज्ञानिक पद्धतीने करणे, संकटकाळी लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यासाठी यंत्रणा उभी करणे, या सर्व गोष्टी परिणामकारकरित्या केल्या तर हिमालयाच्या पायथ्याच्या राज्यांमध्ये दर पावसाळ्यात होणारी जीवित व मालमत्तेची हानी टाळता येईल. राजकीय व प्रशासकीय यंत्रणा विज्ञाननिष्ठा दाखवणार की 'कांचननिष्ठा', हा एक कळीचा प्रश्न आहे!

## आजही ठाम आहे, झेंडावंदन म्हणजे. रायगडच्या पालकमंत्रिपदावरुन भरत गोगावलेंनी स्पष्टच सांगितलं

महाराष्ट्र जीत

**अविनाश जाधव वार्ताहर**

कळंबोली पनवेल (प्रतिनिधी):- महाराष्ट्रातील 2- 3 पालकमंत्री पदासाठी जो वाद महायुती सरकार मध्ये चालू आहे त्यावरती शिवसेनेचे रायगड जिल्ह्यातील नेते श्री भारत गोगावले म्हणतात की , आज ही मी ठाम आहे........ रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाच्या वादात भरत गोगावले यांनी अदिती तटकरे यांच्या स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहणाबाबत प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणतात की, ध्वजारोहण आणि पालकमंत्रीपद हे वेगळे आहेत. ते पालकमंत्रीपदासाठी १००% ठाम असून वरिष्ठांचा कोणताही निर्णय त्यांना मान्य आहे. पूर्वीच्या सरकार ठाण्यापासून रायगडच्या पालकमंत्रिपदाचा वाद शिगेला पोहोचला आहे. रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरुन महायुतीमध्ये तणाव आहे. रायगडच्या पालकमंत्रीपदासाठी



राष्ट्रवादीच्या अदिती तटकरे विरुद्ध शिवसेनेच्या भरत गोगावले यांच्यात संघर्ष सुरु आहे. त्यातच आता येत्या 15 ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहण कोण करणार याबद्दलचा निर्णय जाहीर झाला आहे. या वादाच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने कोणत्या जिल्ह्यात कोण ध्वजारोहण करणार याची यादी जाहीर केली आहे. त्यानुसार रायगडमध्ये अदिती तटकरे ध्वजारोहण करणार आहेत, असे यात नमूद करण्यात आले आहे. आता यावर रोजगार हमी आणि फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

भरत गोगावले हे सध्या दिल्लीत आहेत. त्यांनी नुकतंच अदिती तटकरेंच्या ध्वजारोहणावरुन आणि रायगडच्या पालकमंत्रिपदावरुन भाष्य केले आहे. यावर त्यांनी मी आजही पालकमंत्रिपदावर १०० टक्के ठाम आहे. रायगडाचा पालकमंत्री व्हावं ही माझी इच्छा आहे. झेंडावंदन करणं आणि पालकमंत्रिपद यात फरक आहे, असे भरत गोगावले यांनी म्हटले.

**पालकमंत्रिपदावर १०० टक्के ठाम**

"झेंडावंदन झालं म्हणजे पालकमंत्री झालं असा काही भाग नाही. कारण ते पहिलंच देण्यात आलं होतं. त्यासाठी वरिष्ठांनी जो काही निर्णय घेतलाय तो आम्हाला मान्य असेल. त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. मी आजही पालकमंत्रिपदावर १०० टक्के ठाम आहे. झेंडावंदन झाल्यानंतर याबद्दल वरिष्ठ निर्णय करतील, असं आम्हाला वाटतंय. झेंडावंदन करणं आणि पालकमंत्रिपद यात फरक आहे. त्यामुळे यात वरिष्ठ जो काही निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल", असे भरत गोगावले म्हणाले.

**रायगडाचा पालकमंत्री व्हावं ही आमची इच्छा**

"पालकमंत्रिपदासंदर्भात एकनाथ शिंदे जो काही निर्णय करतील तो आम्हाला मान्य असेल. सुनील तटकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात काही राज्याच्या गोष्टींसंदर्भात चर्चा करण्यासाठी भेट झाली असावी. पण काय चर्चा झाली हे मी विचारलं नाही. आम्ही कधीच नेत्यांना कुठे चाललात, कशाला चाललात हे विचारत नाही. झेंडावंदन त्याच्या हस्ते होतंय, याला माझी हरकत नाही. वरिष्ठांनी दिलेला निर्णय मान्य करायचा असतो. रायगडाचा पालकमंत्री व्हावं ही आमची इच्छा आहे. हो नक्कीच माझी इच्छा पूर्ण होईल", अशा विश्वास भरत गोगावले यांनी व्यक्त केला

## रिपब्लिकन युवा सेनेच्या जिल्हा युवा अध्यक्षपदी भूषण मोरे यांची नियुक्ती.

### सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी दिली जबाबदारी

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर)** आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद,पंचायत समिती, नगरपरिषद,नगरपालिका, महानगरपालिका इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या संदर्भामध्ये विविध पक्षांनी आपली मोर्चे बांधणी सुरू केलेली आहे. अशातच राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना(शिंदे)मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्यासोबत नुकतीच आनंदराज आंबेडकर यांच्या रिपब्लिकन सेनेने युती केलेली आहे.या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन सेनेने संपूर्ण महाराष्ट्र भरामध्ये पक्ष संघटन मजबूत करण्याच्या दृष्टिकोनातून कार्यकर्त्यांना विविध पदावर नियुक्ती करत आहेत.यामध्ये रिपब्लिकन सेनेच्या युवा जिल्हाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते भूषण मोरे यांची नियुक्ती प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे यांनी आनंदराज आंबेडकर यांच्या आदेशानुसार नियुक्तीपत्र देऊन केले आहे. राजकीय, सामाजिक,संघटन,कौशल्य पाहून भूषण मोरे यांचे रिपब्लिकन सेना युवा आघाडी वाशिम जिल्हा युवा अध्यक्षपदी नियुक्ती करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिलेल्या



आहेत.भूषण मोरे हे गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर आहेत.तसेच त्यांचे वाशिम शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रभाव असल्याचे दिसून येते.आनंदराज आंबेडकर यांच्या रिपब्लिकन सेनेने दखल घेऊन त्यांना जिल्हा युवा अध्यक्ष म्हणून जबाबदारी दिलेली आहे. भूषण मोरे यांची रिपब्लिकन सेनेच्या जिल्हा युवा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल जिल्ह्यात त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ किसनराव बागडे यांचा रक्षाबंधन कार्यक्रमात करण्यात आला सन्मान

महाराष्ट्र जीत

जयपूर राजभवन मध्ये राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ किसनराव बागडे यांना रक्षाबंधन कार्यक्रमात १४३ देशांमध्ये ध्यानधारणेचे प्रशिक्षण देत असलेल्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या जयपूर येथील वैशालीनगर सेवाकेंद्राच्या सहसंचालीका बी के चंद्रकला दीदी यांनी राखी बांधली. यावेळी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ किसनराव बागडे यांना निराकार परमपिता परमात्मा शिवबाबांची फ्रेम देऊन बी के चंद्रकला दीदी व १८३ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय ध्यानधारणा प्रशिक्षक डॉ दीपक हरके यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी बी के जयंती दीदी, बी के एकता दीदी व बी के रतन भाई उपस्थित होते.



## भगुर नगर पालिकेच्या सार्वजनिक स्वच्छतागृहाची दुरवस्था, 'स्वच्छ भारत'अभियानास ग्रहण!

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी गोकुळ लोखंडे**

भगुर नगर पालिकेच्या जवळील जुनी नगरपालिका (तलाठी कार्यालय जागे लागत) सार्वजनिक स्वच्छतागृहाचे अस्वच्छता आणि दुर्गंधीचे आगार बनले आहे. या स्वच्छतागृहाची अवस्था इतकी भीषण आहे की, परिसरातून नागरिकांना नाक दाबूनच जावे लागत आहे. प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.व परिसरात रोगराई पसरण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, या स्वच्छतागृहाची अनेक दिवसांपासून साफसफाई व डागडुजी झालेली नाही, त्यामुळे अनेक दिवसापासून हे स्वच्छता गृह बंद अवस्थेत आहे, त्याच्या आतमध्ये सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले असून, दुर्गंधीमुळे श्वास घेणेही मुश्किल झाले आहे. या स्वच्छतागृहाचा व मुतारीचा वापर परिसरातील रहिवाशांसह चौकात येणारे-जाणारे नागरिक व व्यापारी वर्ग,शाळेतून



ये जा करणारे शालेय मुले करीत होते. मात्र, अस्वच्छतेमुळे अनेकांना उघड्यावरच शौचास जावे लागत असल्याने नागरिकांची गैरसोय झालेली तर आहेच व अस्वच्छते मुळे जीविताला धोका निर्माण होऊन आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या समस्येबाबत संतप्त नागरिकांनी अनेकवेळा नगरपालिकेकडे तक्रारी केल्या, मात्र त्याचा काहीही उपयोग होत नाही. अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होऊन'स्वच्छ भारत अभियानाला ग्रहण लागले की काय? असा सवाल स्थानिक नागरिक करत आहे. शहराच्या मध्यवर्ती भागातील या स्वच्छतागृहाची दुरवस्था ही प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब आहे. तातडीने याची दखल घेऊन स्वच्छतागृहाची दुरुस्ती करावी, अशी मागणी संतप्त नागरिकांनी मागणी आहे. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. यावेळी मनसे शहराध्यक्ष सुमित चव्हाण, मनसे उपशहर अध्यक्ष शाम देशमुख, गजानन आंधळे,हरीश देशमुख,हरीश कातकाडे,शेखर आहेर, शुभम देशमुख आदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांचा सत्कार संपन्न.

वाशिम(प्रतिनिधी)रिसोड तालुक्यातील रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी आपल्या कर्तव्याची जाण ठेवून महसुली प्रशासनात आपले कर्तव्य पार पाडले.आपल्या कर्तव्याप्रती प्रामाणीकपणे कार्य पार पाडले.त्याचाच सन्मान म्हणून जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस, उपजिल्हाधिकारी घुगे , जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पीत चव्हाण, उपविभागीय अधिकारी श्रीमती वैशाली देवकर व जिल्ह्यातील सर्वच तहसीलदार,मंडळ अधिकारी यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात उत्कृष्ठ तहसीलदार म्हणून सन्मान करण्यात आला.त्याप्रमाणे त्यांचे अभिनंदन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ रिसोडच्या वतीने दि.११ ऑगष्ट रोजी वतीने पूष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी संघटनेचे तालुकाध्यक्ष नारायण आरु, डॉ.रामेश्वर रंजवे, ज्ञानेश्वर कायंदे, गजानन साळेगावकर इत्यादी मंडळी उपस्थित होती.




## निकामी जनावरांसह प्रहारचा जिल्हाधिकारी कार्यालयावर आज धडक मोर्चा; सरसकट बोनस व कर्जमाफीची मागणी

महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा**

**भंडारा:** जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर 'धडक मोर्चा' काढण्यात येणार आहे. गेल्या दोन महिन्यांपासून बंद असलेली निकामी जनावरांची खरेदी-विक्री तात्काळ सुरू करावी, या प्रमुख मागणीसाठी थेट निकामी जनावरेच मोर्चात आणून त्यांच्या चाऱ्याची सोय प्रशासनाने करावी, असा आक्रमक पवित्रा पक्षाने घेतला आहे. यासोबतच धान उत्पादक शेतकऱ्यांना सरसकट बोनस द्यावा, संपूर्ण कर्जमाफी लागू करावी आणि जनावरांची वाहतूक करताना पोलिसांकडून होणारा त्रास थांबवावा, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत. हा मोर्चा सकाळी ११ वाजता जलाराम कार्यालयापासून सुरू होऊन गांधी चौक व बस स्टॉप मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. या आंदोलनात जिल्ह्यातील शेतकरी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्रहार जनशक्ती पक्षातर्फे करण्यात आले आहे.

## मावडी सुपे मध्ये बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना

महाराष्ट्र जीत

**सासवड.** प्रतिनिधी शाम जगताप..पुरंदर तालुक्यातील मावडी सुपे येथे बौद्धधम्माचा पवित्र संदेश देणारा ऐतिहासिक कार्यक्रम बुद्धांच्या मूर्तीची प्रतिष्ठापनाकरुन साजरा करण्यात आला. बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना पनवेल येथील प्रसिद्ध उद्योगपती किशोर जी कामत यांच्या हस्ते करण्यात आली.भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ.भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा येथील आयु. भंते दीपंकार थेरो यांच्या हस्ते सर्व धार्मिक विधी पार पाडण्यात आला.बौद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापनेच्या अनुषंगाने मावळे गावांमध्ये दिवसभर अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी नऊ वाजता ध्वजारोहण व धम्म वंदना घेण्यात आली.बारा ते एक वाजेपर्यंत संपूर्ण गावामध्ये सवाद्य मंगलमय वातावरणामध्ये बुद्धम् शरणम् गच्छामि या गजरामध्ये भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीचे मिरवणूक काढण्यात आली. वरून राजाने देखील मेघ वृष्टीने भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीवर पुष्प वृष्टीचा वर्षाव केला. सवाद्य मिरवणुकीनंतर भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीची विधिवत बौद्ध धम्माच्या नियमानुसार प्रतिष्ठापना करण्यात आली.तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती कुशल शिंदे यांच्या हस्ते बसविण्यात आली. बुद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापनेनंतर उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.बौद्ध धर्माच्या पवित्र वर्षावासातील पवित्र महिना असल्यामुळे बौद्धचार्य वाघमारे यांनी धम्म देसना व धम्म प्रवचन वामन वाघमारे यांनी केले.बौद्ध धार्मिक विधी पुरंदर तालुका भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य दादासाहेब गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्रिशरण, पंचशील, बुद्ध पूजा, भीम स्तुती, सरनेत्य इत्यादी विधी पार पाडला. यावेळी उद्योगपती किशोर जी कामत,बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनील तात्या धिवार,प्रसिद्ध निवेदक जितेंद्र देवकर,अशोक गायकवाड, सर,बौद्धचार्य योगेश,बौद्धचार्य बापू सोनवणे,बौद्धचार्य मल्हार सोनवणे, धम्म भगिनी शालन ताई सोनवणे,धम्म भगिनी निलंगी भोसले,धम्म भगिनी संतोली सोनवणे ,बौद्धचार्य मल्हार वानखेडे,नथुराम साखरे,सरपंच अनिल देवकर यासह अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी प्रमुख उपस्थिती मध्ये विविध गावचे बौद्ध उपासक आणि उपासिका उपस्थित होते. त्यामध्ये उत्तम देवकर,किरण देवकर,किसन आप्पा देवकर,माजी कृषी अधिकारी सुनील जगताप,पुरंदर तालुका आर. पी.आय.अध्यक्ष बळीराम सोनवणे,श्रमिक ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष कालिदास उबाळे,सामाजिक कार्यकर्ते सुहास बेंगळे,संजय कांबळे,बाळ कांबळे,प्रकाश कांबळे,मुरलीधर कांबळे,अक्षय रोकडे,प्रवीण वाघमारे, दत्तात्रय वाघमारे,प्रकाश जमदाडे,आप्पा वाघमारे,मिलिंद गायकवाड,दिनेश गायकवाड,दिनकर देवकर,दिलीप देवकर,विजय बापू देवकर,प्रकाश कांबळे,कुशल शिंदे,सोनवणे गुरुजी यासह संयोजक बौद्धजन विकास मंडळाचे सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनील तात्या धिवार म्हणाले की आता तुमच्या गावामध्ये बुद्धांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आलेली आहे. तुमची जबाबदारी वाढलेली आहे भगवान गौतम बुद्ध हे शांततेचा प्रतीक आहे. करुण आणि प्रेम यांचे प्रतीक आहे. मावडीकर ग्रामस्थांसह शिंदे परिवाराने या भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीचे मांगल्य जपले पाहिजे. दर रविवारी विहारांमध्ये येऊन अबाल वृद्धांनी त्रिशरण आणि पंचशील ग्रहण केले पाहिजे.

## विक्रोळीत पालिका आरोग्य व्यवस्थेची तिरडी

### आंदोलना पूर्वीच डॉ योगेश भालेराव पोलिसांच्या ताब्यात

महाराष्ट्र जीत

**घाटकोपर - केतन भोज**

मुंबई महानगर पालिकेतील रुग्णालयात रुग्णांना न मिळणारी सुविधा , अपुरे बेड, डॉक्टर आणि स्टाफ ची कमतरता या अभावामुळे रुग्णांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागते. देशातील सर्वाधिक श्रीमंत पालिका म्हणून मुंबई महानगर पालिकेचा गवगवा होत असताना मुंबईतील रुग्णालयाची अवस्था इतकी बिकट का असा सवाल करत विक्रोळीतील समाजसेवक डॉ योगेश भालेराव यांनी पालिकेच्या आरोग्य खात्याची आज सकाळी तिरडी यात्रा काढण्याचा प्रयत्न केला. मात्र आंदोलनं होण्यापूर्वीच विक्रोळी पोलिसानी त्यांना ताब्यात घेतले. विक्रोळीतील डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय ते स्मशानभूमी पर्यंत ही तिरडी यात्रा काढण्यात येणार होती. समाजसेवक डॉ योगेश भालेराव यांनी सांगितले की मुंबई शहरा मध्ये 2/3 कोटी लोकसंख्या आहे. महापालिके अंतर्गत असलेल्या रुग्णालय मध्ये वार्ड व आय सी सी यू मध्ये तब्बल 15 हजारच्या सुमारास बेड आहेत. एवढे बेड 2/3 कोटी जनतेला पुरेसे आहेत का . जी व्यवस्था वेळेवर उपचार देत नाही , रुग्णांना बेड अभावी जमिनीवर उपचार घ्यावे लागतात अशा आरोग्य व्यवस्थेचे काय करायचे. पालिकेच्या ढासललेल्या आरोग्य व्यवस्थेची आम्ही आज तिरडी आंदोलन घेतले पण पोलिसानी आमचे हे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)
१ २ ३ ४ ५ ६

## माळी समाज गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन.

महाराष्ट्र जीत

**कारंजा दि. १२(प्रतिनिधी)**
वाशीम जिल्हा माळी कर्मचारी सेवा मंडळ कारंजाचे वतीने दिनांक १७ ऑगस्ट रोजी रविवारला १०वि,१२वी गुणवंत विद्यार्थ्यांचा तथा विविध क्षेत्रातील विद्यार्थी तथा मान्यवरांचा गौरव सत्कार समारंभ स्थानिक महेश भवन येथे दुपारी दोन वाजता आयोजित केलेला आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अकोला (खडकी) वधू वर परिचय मेळावा मा.अध्यक्ष गजेंद्र काळे हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून समाज कल्याण अकोला येथील सहा.आयुक्त मारोतराव वाठ,दारव्हा येथील तहसीलदार रवी काळे,महाराष्ट्र मुख्याध्यापक संघाचेअध्यक्ष प्रा.शत्रुघ्न बिडकर,कारंजा सेंटर बँकेचे व्यवस्थापक राहुल काळे,कारंजा तालुका अधिकारी अश्विनी भोसले व व माळी कर्मचारी मंडळाचे जिल्हाध्यक्ष श्रीकृष्ण बोळे हे राहणार आहेत तरी. कारंजा तालुक्यातील माळी समाजातील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी, इतर गुणवंतांनी व पालकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन माळी कर्मचारी सेवा मंडळ,ज्योती सावित्री ट्रस्ट, माळी युवा मंच कारंजा आणि अखिल भारतीय माळी महासंघाने केले आहे.

## लेंडी धरणग्रस्तांची प्रलंबित मागण्याकरिता जन आंदोलन साखळी उपोषणाचा भक्कम निर्धार

### येणाऱ्या काळात संबंधित मागण्यांची पूर्तता न झाल्यास जलसंपदा विभाग कार्यालयास कुलूप ठोकणार- गंगाधर भेंडेगावकर

महाराष्ट्र जीत

देगलूर तालुका प्रतिनिधी/संघपाल मदने
दिनांक ११ ऑगस्ट २०२५ पासून उपजिल्हाधिकारी कार्यालय देगलूर येथे जन आंदोलन साखळी उपोषण लेंडी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन संदर्भात विविध मागण्याबाबत साखळी उपोषण सुरू झाले. सदर जन आंदोलन साखळी उपोषण सुरुवात शहरातील महात्मा गांधी पुतळा पुष्पहार वंदन, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा पुष्पहार वंदन अण्णाभाऊ साठे चौक, पुष्पहार वंदन ते उपजिल्हाधिकारी कार्यालय देगलूर अशी आक्रमक घोषणा देत सुरुवात करण्यात आली. प्रकल्पातील बुडीत क्षेत्रातील नागरिकांच्या हक्कासाठी वारंवार शासन दरबारी निवेदना मार्फत पत्रव्यवहार करून पण बारा गावचे प्रलंबित पुनर्वसन संदर्भात प्रश्न जसेच्या तसे आहेत, बुडीत क्षेत्रातील सुशिक्षित बेरोजगारांना पॅकेज देण्यात यावे, बारा बलुतेदार यांना व्यवसायिक अनुदान देण्यात यावे, अनुसूचित जाती भूमिहीन कामगारांना अनुदान, भेंडेगाव खुर्द स्वच्छ पुनर्वसन अनुदान, पुनर्वसन ठिकाणी नागरी दर्जेदार सुविधा पुरवण्यात याव्यात अशा विविध मागणी करता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार गटाचे ओबीसी सेल जिल्हा संघटक गंगाधरराव भेंडेगावकर यांच्या नेतृत्वाखाली हे जन




आंदोलन उभारले. लेंडी प्रधान प्रकल्प जवळपास ९० टक्के माती बांधकाम प्रगतीपथावर आहे, पुनर्वसन संदर्भात ६०% काम पूर्ण झाले आहे अजून ४०% अपूर्ण आहे अशातच धरणातील बुडीत क्षेत्रातील बारा गावांचे प्रलंबित पुनर्वसनासंदर्भात मागण्या आहेत, आहे त्या स्थितीमध्ये आहेत, त्यांच्यावर प्रशासनामार्फत अन्याय पाहावयास मिळत आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे, प्रलंबित मागण्या पैकी सुशिक्षित बेरोजगारांना दहा लाख रुपये शासनाने अनुदान देण्यात यावे, भेंडेगाव खुर्द स्वच्छ पुनर्वसन नागरी सुविधा अनुदान, बारा बलुतेदार व्यवसाय स्थर अनुदान, भूमिहीन कामगारांना निर्वाह भत्ता शासन स्तरावर अनुदान रक्कम, प्रकल्पग्रस्त ऐवजी एक कट्टा रक्कम जाहीर करून द्यावी, तात्काळ वाहतूक स्थलांतर भत्ता नवीन जीआर नुसार देण्यात यावे, अशा प्रलंबित मागण्यांची तात्काळ पूर्तता करावी ज्याप्रमाणे गळभरणी करण्यास व पाणी आडवण्यामध्ये सरकार ला यश मिळाले त्याच पद्धतीने फास्टट्रॅक वर पुनर्वसनाची दर्जेदार कामे व्हावेत, त्याचबरोबर मागील विविध तक्रारदारांच्या माध्यमातून अधिकाऱ्यांच्या विषयी चव्हाट्यावर आहे तो म्हणजे शासकीय सेवा करताना शासनाच्या पैशाचा गैरवापर करणाऱ्या कार्यकारी अभियंता तिडके यांच्या भ्रष्ट कामाची तात्पुरता निवारा शेड 6.5 कोटी दाखवून निकृष्ट पुनर्वसन दर्जा, पत्रा बांबू दाखवून करोडो रुपये हडप करून शासनाची फसवणूक केली त्यामुळे त्यांच्या मालमत्तेची चौकशी करून त्यांना निलंबित करून गुन्हे दाखल करण्यात यावे व काही आमच्या जीवितास बरे वाट झाल्यास शासन जबाबदार राहील असे धरणग्रस्त बुडीत क्षेत्र गावातील गंगाधर भेंडेगावकर यांनी निवेदनामार्फत प्रशासनाला सूचना केल्या आहेत. निवेदनावर गंगाधर नारायण भेंडेगावकर, नंदकिशोर राजाराम खंडागळे, तानाजी रामराव आगदे, लक्ष्मण सोरटे, दत्तात्रय कोलामंगल, यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी भेंडेगाव खुर्द गावातील धरणग्रस्त व इतर धरणग्रस्त उपस्थित होते.

## डॉ. अपूर्वाची गगनभरारी . शिक्षण प्रेमींना डॉ अपूर्वाचा अभीमान .

महाराष्ट्र जीत



**नकूल उपाध्ये / कारंजा लाड:**
डॉ. अपूर्वा गोपाल उपाध्ये -लोखंडे ही एम बी बी एस . नीट मधे ओबीसी कोट्यातून विदर्भातून टॉप्पर होती. सर्जन होण्याची इच्छा असल्याने तीने वर्धा येथे एम एस केले. एम.एस. नंतर M. Ch. (CVTS ) ची इच्छा असल्याने जिद्दीने शिक्षण अहर्ता पूर्ण केली. M. Ch. साठी राजर्षी छत्रपती शाहू गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज कोल्हापूरला मेरिटवर नुकताच प्रवेश घेतला आहे. ही कौतुकाची बाब आहे.
ती मूर्तिजापूर येथील सामाजिक कार्यकर्ते आणि श्री. गाडगे महाराज महाविद्यालय, मूर्तिजापूर जी .अकोला येथील प्रा.डॉ. गोपाल आणि पुष्पलता उपाध्ये यांच्या कन्या आहे तसेच ख्यातीप्राप्त सर्जन डॉ शशिकांत लोखंडे आणि डॉ रत्नप्रभा लोखंडे यांच्या सून असून नाशिक येथील डॉ. सिद्धेश लोखंडे अस्थीरोग तज्ञ यांच्या सहचारिणी आहेत.हार्ट सर्जन म्हणून तीचा लौकिक होवो अशा शुभेच्छा अनेक मान्यवरांनी तीला दिल्या आहेत. डॉ अपूर्वा ही डॉ गोपाल उपाध्ये यांची एकुलती एक मुलगी असून गुणी आहेत. नाटक, कविता, वक्तृत्व तथा चित्रकलेत निपुण आहेत. तीच्या यशाचे व वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात घेतलेल्या गगन भरारीचे कौतुक माजी प्राचार्य अशोकराव उपाध्ये; शिक्षण विस्तार अधिकारी सुनील उपाध्ये; डॉ नितीन उपाध्ये; डॉ प्रशांत वाघमारे; सरपंच नितीन पाटील उपाध्ये; सुभाष पाटील उपाध्ये;प्रमोद उपाध्ये, सुदर्शन दिनेश उपाध्ये ;डॉ विशाल उपाध्ये -डॉ-सुषमा उपाध्ये, डॉ अविश दरेकर, अतुल दरेकर, धनंजय देशमुख, विजय शामसुंदर, सुरेश वानखडे, निलेश पुंड, प्रकाश गावंडे, गणेश गावंडे, सदा रोकडे, ज्ञानेश्वर सोळंके,श्रीमती गीताताई रुंदन राठोड, श्री.गोपीचंद पवार डॉ कुंदन शामसुंदर, श्रीकांत भाके,राधाताई मुरकुटे, संतोष पवार, डॉ मोरे, अश्विन वाकोडे, प्रा. गजानन घोंगटे, हंसराज शेंडे, गुलाबसिंग राठोड, प्रमोद पवार, डॉ सदाशिव बिहाडे.प्रकाश वानखडे, पोलीस पाटील गजानन सोळंके, अमोल चौधरी, आशिष चौधरी, अनिल चौधरी, जय चौधरी, बंडू बोरकर, माधवराव घोडमारे, बिटू, बबन पाटील इत्यादीनी केले असून अपूर्वाच्या यशाबद्दल तीचे अभिनंदन केले आहे. अपूर्वा मूळची दापुरा ता .मानोरा गावची असून गावाबाद्दल तिच्या मनात अपार प्रेम आहे. तीच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## धुमका टोल प्लाजावरील सुख, सुविधा व रस्ता अद्यापही नाही. कायमचा टोल बंद करण्याचा मनसेचा इशारा

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी)** वाशिम इथून जवळच असलेल्या धुमका टोल प्लाजावर दिनांक 128 2025 रोजी महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेच्या वतीने पाहणी केली असता, या धुमका टोल प्लाजावरील सुख सुविधा व टोल वर कुठल्याच प्रकारची त्या ठिकाणी सुख सुविधा व 500 मीटरचा रोड अद्यापही बनवण्यात आलेला नसल्याची बाब समोर आली आहे. गेल्या तीन वर्षापासून महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेना सर्व या बाबीचा पाठपुरावा करत आहे.या ठिकाणी अद्यापही कुठल्या प्रकारची सुधारणा करण्यात आली नाही.तरीही टोल आकारण्याचे काम एन .एच .आय करत आहे. त्या विरोधात महाराष्ट्र निर्माण वाहतूक सेनेच्या वतीने टोल वरती दि.8/7/2025 रोजी वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष तथा जिल्हा सचिव गजानन वैरागडे वाहतूक सेना शहर अध्यक्ष उमेश टोलमारे यांच्या वतीने आंदोलन करून सुद्धा यांच्यावर काहीच फरक पडलेला दिसून येत नाही. त्या ठिकाणावर आतापर्यंत चार लोकांना आपला जीव गमवावा लागला.याला दोषी संबंधित विभाग व मंत्री असल्याचा आरोपी देखील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर त्यांनी राजीनामा द्यावा कारण आपल्या कुठल्याच आदेशाचे पालन एन .एच .आयचे अधिकारी करत नाहीत.यावेळी उपस्थित मनसे जिल्हाध्यक्ष राजू पाटील किडशे मनविसे जिल्हा उपाध्यक्ष गजानन कढणे इत्यादी होते.



## घोडेगाव येथे जागतिक आदिवासी दिनानिमित्त प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांच्या हस्ते पत्रकार स्नेहा उत्तम मडावी यांचा सत्कार करण्यात आला

महाराष्ट्र जीत

आंबेगावः आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव, आंबेगाव सांस्कृतिक उत्सव समिती आणि केंद्रीय दूरसंचार ब्युरो, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने घोडेगाव येथे जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात हजारो आदिवासी बांधवांनी उत्स्फूर्तपणे सहभाग मुख्य कार्यक्रम घोडेगाव येथील वनमाला मंगल कार्यालयात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बुधाजी डामसे होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून राज्यमंत्री दर्जा असलेले म्हाडाचे शिवाजीराव अढळराव पाटील, आंबेगावचे आमदार . दिलीपराव वळसे पाटील, देवदत्त निकम साहेब, आदिवाशी पारधी समाजाचे समाजसेवक साहित्यिक नामदेव भोसले साहेब उपस्थित होते. या मान्यवरांनी आपल्या मनोगतातून आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी सुरू असलेल्या योजनांवर प्रकाश टाकला आणि आदिवासी बांधवांना शुभेच्छा दिल्या. प्रमुख वक्ते प्रा. हनुमंत भावरी यांनी आदिवासी विकासाबाबत मार्गदर्शन केले पत्रकार स्नेहा उत्तम मडावी यांचा सत्कार घोडेगावचे प्रकल्प अधिकारी पुणे प्रदीप देसाई यांच्या हस्ते करण्यात आला पत्रकार उपस्तित होते .कार्यक्रमात उपस्थित जनसमुदायाला आदिवासी विकासाच्या विविध योजनांच्या यशोगाथा स्क्रीनवर दाखवण्यात आल्या. या यशोगाथांनी उपस्थितांना प्रेरणा मिळाली. या कार्यक्रमाचे आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे महाराष्ट्र शासनाने नागपूर येथे सुरू केलेल्या 'राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजना'चा शुभारंभ सोहळा थेट स्क्रीनवर दाखवण्यात आला. या थेट प्रक्षेपणाने उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन नंदकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक काळुराम भावरी यांनी केले. या कार्यक्रमाला प्रकल्प अधिकारी . प्रदीप देसाई, दुरसंचर विभागाचे फॅनिकुमार साहेब किरण गाभाले साहेब, सुभाष मोरमारे यांच्यासह शासकीय कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी विविध समाजांतील संघटनांचे प्रतिनिधी आणि आर्दश माता शेवराबाई ज्ञानदेव भोसले लेखक भास्कर भोसले ऋतुजारांनी भोसले सुजाता भोसले सुरेखा भोसले सुजाता भोसले ग्रिष्म तुकाराम भोसले तुकाराम भोसले पत्रकार सुनिल ज्ञानदेव भोसले सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम आदिवासी संस्कृतीचा गौरव आणि समाजाच्या विकासाची दिशा दर्शवणारा ठरला.

## बाबीर विद्यालयातील विद्यार्थिनींनीबांधल्या झाडांना राख्या

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी श्याम जगताप**
रुई ता. इंदापूर येथील श्री बाबीर विद्यालयात इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनींनी स्वतः लागवड केलेल्या व वाढवलेल्या वृक्षांना राख्या बांधून वृक्ष संवर्धनाची शपथ घेतली.
महाराष्ट्र शासनाने नुकतेच दहा कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवले आहे त्या दृष्टीने विद्यालयात 'हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र, या उपक्रमांतर्गत 'अमृतवृक्ष" या महाराष्ट्र शासनाच्या संकल्पनेमध्ये विद्यालयाने मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्याचा संकल्प केला असून यामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या घराभोवतांच्या परिसरामध्ये फळझाडे तसेच अनेक वृक्ष लागवड करण्याची विद्यार्थ्यांना सूचना केली आहे आणि त्या दृष्टीने विद्यार्थी वृक्षारोपण करीत आहेत, वृक्षांचे महत्त्व समजावे यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक जगन्नाथ पाटील हे सतत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असतात आणि त्यामुळे विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करीत आहेत आणि याचाच परिणाम म्हणजे गेल्या दहा-बारा वर्षांपूर्वी लागवड केलेल्या आणि मोठ्या प्रमाणावर वाढ झालेल्या वृक्षाच्या सावलीखालीच अनेक कार्यक्रम या विद्यालयांमध्ये घेतले जात आहेत.



या विद्यालयातील इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी यांनी स्वतः संगोपन केलेल्या झाडांना राखी बांधून अनोखा उपक्रम राबवला आहे. यासाठी या विद्यालयातील कलाशिक्षक अमीन मुल्ला हे या विद्यालयातील अनेक उपक्रम राबविण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. त्यामध्ये राख्या बनवणे, रांगोळी काढणे, आकाश कंदील बनवणे,चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा,वकृत्व स्पर्धा यामध्ये विद्यार्थ्यांना सहभाग घेण्यास प्रवृत्त करणे असे विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे व विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे असे विविध उपक्रम या विद्यालयामध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक जगन्नाथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सतत राबवले जात आहेत. या उपक्रमासाठी संस्थेचे मोलाचे सहकार्य व प्रोत्साहन मिळत असते.

## बाबू जाधव यांची पोलीस उपनिरीक्षक म्हणून पदोन्नती

**महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे तालुका प्रतिनिधी**



माहूर पोलीस स्टेशन येथे कर्तव्यावर असलेले सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक( ए एस आय )बाबू नानू जाधव यांनी सन 2013 ला विभागीय परीक्षा दिली होती, त्यात ते उत्तीर्ण झालेले असून बाबू जाधव यांची पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती झाली आहे, बाबू जाधव हे सन 2013 मध्ये माहूर तालुक्यातील सिंदखेड पोलीस स्टेशन येथे जमादार म्हणून कार्यरत होते, तेव्हा त्यांनी विभागीय परीक्षा दिली होती 24 रोजी जाधव यांना पोलीस उपनिरीक्षक म्हणून बढती मिळाली आहे,तसेच त्यांना पुन्हा माहूर पोलीस स्टेशन येथे नेमणूक देण्यात आलीआहे 10 ऑगस्ट रोजी माहूर पोलीस स्टेशन येथे हजर झाले असता पोलीस निरीक्षक गणेश कराड, पालसिंग ब्राह्मण, संदीप अनेबोईनवाड, गजानन चौधरी, गेडाम,गजानन जाधव, गृह रक्षक दलाचे रज्जाक, एस पी भगत, राहुल राठोड, संघपाल सोनसळे, आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे,

## वंचित बहुजन महिला आघाडीच्या वतीने वाशिम पोलीस स्टेशनमध्ये रक्षाबंधनाचा कार्यक्रम संपन्न'

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर)** राखी पौर्णिमा' हा सण नुकताच साजरा झाला. या निमित्ताने वंचित बहुजन महिला आघाडी वाशिम जिल्ह्याच्या वतीने महिला पदाधिकारी, आपल्या वाशिम शहर पोलीस स्टेशन आणि ग्रामीण पोलीस स्टेशन येथे जाऊन मंगळवार 12 ऑगस्ट रोजी पोलिसांना (महिला आणि पुरुष पोलिसांना) भगिनीभावाने राखी बांधली. पोलीस कर्मचारी बांधव आणि भगिनी यांना नागरिकांच्या मानवी हक्कांचे रक्षण



करण्याच्या त्यांच्या कर्तव्याची जाणीव व्हावी. स्त्री -पुरुष समानता ही भावना त्यांच्यामध्ये निर्माण व्हावी म्हणून वंचित बहुजन महिला आघाडी जिल्हा वाशिम च्या वतीने आज वाशिम शहरां मधील शहर पोलीस ठाण्यात आपल्या पोलीस बांधवांना राखी बांधून हा राखी पौर्णिमेचा सण साजरा करण्यात आला. यावेळी वंचित बहुजन महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष ज्योतीताई इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली वंचित बहुजन महिला आघाडीच्या सर्व पदाधिकारी उपस्थित होत्या त्यामध्ये वंचित बहुजन महिला आघाडी जिल्हा महासचिव प्रतिभाताई अंभोरे वाशिम तालुका अध्यक्ष विमलताई सावळे रिसोड तालुका अध्यक्ष मायाताई अंभोरे, सुनीताताई खाडे, करुणा सावळे, रिठद सर्कल अध्यक्ष, मनीषा सुतार आणि बहुसंख्य महिला उपस्थित होत्या. यावेळी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस बांधव विरेंद्र खराटे साहेब ,गिरी साहेब ग्रामीण पोलीस स्टेशनचे घाटे साहेब, कॉन्स्टेबल किरण तायडे मॅडम यांनी या स्तुत्य उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

## ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस.आर.रंगनाथन यांची पंचसूत्री तत्तवे : प्रा.डॉ. चरनसिंग राठोड

महाराष्ट्र जीत




**देगलूर तालुका प्रतिनिधी/ संघपाल मदने**
देगलूर तालुक्यातील हनेगाव येथील कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभाग यांच्याकडून डॉ.एस.आर. रंगनाथन यांची जयंती दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे कार्यवाहक प्रा.डॉ. चरणसिंग राठोड यांच्या हस्ते डॉ. एस.आर रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. पंचशील एकंबेकर सर यांच्या मार्गदर्शनाने हा कार्यक्रम घेण्यात आला. एन.एस. एस. कार्यक्रमाधिकारी उमाकांत बिरादार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून रंगनाथन यांच्या कार्याची माहिती दिली. तर या प्रसंगी व्याख्याते म्हणून महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ.उत्तम मानवते यांनी आपल्या व्याख्यानातून एस. आर.रंगनाथन यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकला. दुसरे वक्ते लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा.डॉ.आनंद शिंदे यांनी मानवी जीवनात ग्रंथालयाचे महत्त्व या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष चरनसिंग राठोड यांनी अध्यक्षीय समारोपातून रंगनाथन यांच्या पंचसूत्री तत्त्वाचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भूगोल प्रमुख प्रा. डॉ. सूर्यकांत कळसकर यांनी केले.तर आभार एन. एस. एस.कार्यक्रमाधिकारी मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ.कांबळे एस.एस.यांनी मानले. या कार्यक्रमाचे आयोजक ग्रंथालय विभागाचे परिचर शंकर राठोड यानी यशस्वीरित्या हा कार्यक्रम घडवून आणला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रा.डॉ. अशोक साबणे,प्रा डॉ.पवन एमेकर,प्रा. शीलादेवी कांबळे, प्रा.डॉ.बालाजी राठोड, प्रा भारत बिरादार, ओ एस. भाऊराव पवार, वरिष्ठ लिपिक जयप्रकाश झमकाडे,संतोष सुरेवाड,मारुती चव्हाण, व्यंकट वाघमारे,कांबळे रोहित, आणि विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित राहून हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

## रावसाहेब अंतापूरकर जयंती: हजारो जनतेची आदरांजली

### राजकीय सीमा ओलांडून नेत्याला मानवंदना

महाराष्ट्र जीत

**देगलूर तालुका प्रतिनिधी/संघपाल मदने**
देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आणि दिवंगत आमदार, स्वर्गीय रावसाहेब अंतापूरकर यांच्या जयंतीनिमित्त, त्यांच्या समाधीस्थळी अंतापूर येथे १२ ऑगस्ट रोजी आदरांजली वाहण्यासाठी हजारोंच्या संख्येने सर्वपक्षीय कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी गर्दी केली. आपल्या लाडक्या नेत्याच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनसमुदाय जमला होता. यावेळी, आमदार जितेश अंतापूरकर यांनी सकाळीच आपल्या वडिलांच्या समाधीस्थळी आदरांजली अर्पण केली. त्यानंतर त्यांनी उपस्थित हजारो नागरिकांची आपुलकीने भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी अनेकांनी त्यांच्यासोबत आपल्या भावना व्यक्त केल्या. रावसाहेब अंतापूरकर यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याची आठवण यावेळी अनेकांनी सांगितली. त्यांच्या कार्याची छाप आजही जनमानसावर किती गहरी आहे, याचे दर्शन या गर्दीतून घडले. रावसाहेब अंतापूरकर यांनी आपल्या आमदारकीच्या काळात या भागाच्या विकासासाठी केलेले कार्य आजही लोकांच्या स्मरणात आहे. त्यांच्या कार्याचा वारसा त्यांचे पुत्र आमदार जितेश अंतापूरकर पुढे चालवत असल्याचा विश्वास अनेकांनी व्यक्त केला. या जयंतीदिनी, रावसाहेब अंतापूरकर यांना आदरांजली वाहण्यासाठी विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते,समाजमाध्यम प्रतिनिधि,शैक्षणिक, सामाजिक,उद्योगिक क्षेत्रातील आणि सामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली



## चुल्हाड येथे आल्हा-उद्दल शौर्यगाथेने भुजली उत्सव साजरा.

महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा**

सिहोरा :- चुल्हाड येथे एकलव्य कहार समाज संघटनेच्या वतीने भूजली परंपरा कायम ठेवत भुजली उत्सव हा सण कहार समाज बांधवाच्या वतीने व आला उद्दल शौर्यगाथेने मोठ्या थाटात व उत्साहात साजरा करण्यात आला. आजच्या काळात ग्रामीण भागात.रूढी परंपरेला खूप महत्त्व आहे.चुल्हाड हे जिल्हा परिषद क्षेत्र आहे. येथे कहार समाज बांधवांनी भुजली उत्सवाच्या माध्यमातून स्नेह बंधनाची नाती विणली असुन कहार समाजात रक्षा बंधनाच्या दिवशी भुजली उत्सवाला खूप महत्त्व दिले जात आहे. रक्षाबंधनाच्या दुसऱ्या दिवशी भुजली विसर्जन करण्याची परंपरा व या परंपरेला अबाधित ठेवण्यासाठी एकलव्य कहार समाज संघटनेने भुजली उत्सवासाठी पुढाकार घेतला.

गावातील मुख्य चौकात भुजलीचे सामूहिक पूजन करून आल्हा–उद्दलच्या शौर्यगाथा व समाजातील विचार व प्रसाराचे माध्यम म्हणून गावात रॅली काढण्यात आली.यावेळी नागरिकांना महाप्रसाद व मठ्ठा वितरण करण्यात आले.पूर्वजांच्या काळापासून सुरू असलेली भुजली उत्सव परंपरा कहार समाज बांधवांनी कायम ठेवीत ती कहार समाज बांधवांनी जोपासली असून तलावात भुजलीचे विसर्जन करून एकमेकांना भुजली देत स्नेह भेटीचा व नातेसंबंध दृढ करणारा आणी एकतेचा संदेश देत शक्ती वाढविणारा भुजली उत्सव सण मोठ्या आनंदात व थाटात साजरा केला. यावेळी एकलव्य कहार समाज संघटनेचे दिलीप बंसोड, किशोर बंसोड,रामेश्वर बंसोड,सुभाष बंसोड,कन्हैया बंसोड,कुवरलाल बंसोड,संतोष बंसोड,लोकेश मानकर, गौरव बंसोड,छोटू बंसोड,गितेश बंसोड,राजकुमार बंसोड,प्रदीप बंसोड,प्रकाश बंसोड,गोलू बंसोड, हिरागीर रिदनार्थी,लालगीर रिदनार्थी, ग्रा. पं.सदस्य पार्वता बंसोड, उपसरपंच डॉ. रमेश पारधी,ग्रा.पं.सदस्य परमभूषण शामकुवर,ग्रा.पं.सदस्य भास्कर सोनेवाने,सुधीर रामटेके,धनराज देव्हारे,इंद्रपालसिंह सोलंकी,संजय हाडगे, कहार समाज व ग्रामवासियांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

## मावडी सुपे मध्ये बुद्ध मूर्तींची प्रतिष्ठापना

महाराष्ट्र जीत

सासवड. प्रतिनिधी शाम जगताप..पुरंदर तालुक्यातील मावडी सुपे येथे बौद्धधम्माचा पवित्र संदेश देणारा ऐतिहासिक कार्यक्रम बुद्धांच्या मूर्तीची प्रतिष्ठापनाकरुन साजरा करण्यात आला. बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना पनवेल येथील प्रसिद्ध उद्योगपती किशोर जी कामत यांच्या हस्ते करण्यात आली.भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ.भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा येथील आयु. भंते दीपंकार थेरो यांच्या हस्ते सर्व धार्मिक विधी पार पाडण्यात आला.बौद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापनेच्या अनुषंगाने मावळे गावांमध्ये दिवसभर अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी नऊ वाजता ध्वजारोहण व धम्म वंदना घेण्यात आली.बारा ते एक वाजेपर्यंत संपूर्ण गावामध्ये सवाद्य मंगलमय वातावरणामध्ये बुद्धम् शरणम् गच्छामि या गजरामध्ये भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीचे मिरवणूक काढण्यात आली. वरून राजाने देखील मेघ वृष्टीने भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीवर पुष्प वृष्टीचा वर्षाव केला. सवाद्य मिरवणुकीनंतर भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीची विधिवत बौद्ध धम्माच्या नियमानुसार प्रतिष्ठापना करण्यात आली.तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती कुशल शिंदे यांच्या हस्ते बसविण्यात आली. बुद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापनेनंतर उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.बौद्ध धर्माच्या पवित्र वर्षावासातील पवित्र महिना असल्यामुळे बौद्धचार्य वाघमारे यांनी धम्म देसना व धम्म प्रवचन वामन वाघमारे यांनी केले.बौद्ध धार्मिक विधी पुरंदर तालुका भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य दादासाहेब गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्रिशरण, पंचशील, बुद्ध पूजा, भीम स्तुती, सरनेत्य इत्यादी विधी पार पाडला. यावेळी उद्योगपती किशोर जी कामत,बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनील तात्या धिवार,प्रसिद्ध निवेदक जितेंद्र देवकर,अशोक गायकवाड, सर,बौद्धचार्य योगेश,बौद्धचार्य बापू सोनवणे,बौद्धचार्य मल्हार सोनवणे, धम्म भगिनी शालन ताई सोनवणे,धम्म भगिनी निलंगी भोसले,धम्म भगिनी संतोली सोनवणे ,बौद्धचार्य मल्हार वानखेडे,नथुराम साखरे,सरपंच अनिल देवकर यासह अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी प्रमुख उपस्थिती मध्ये विविध गावचे बौद्ध उपासक आणि उपासिका उपस्थित होते.त्यामध्ये उत्तम देवकर,किरण देवकर,किसन आप्पा देवकर,माजी कृषी अधिकारी सुनील जगताप,पुरंदर तालुका आर. पी.आय.अध्यक्ष बळीराम सोनवणे,श्रमिक ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष कालिदास उबाळे,सामाजिक कार्यकर्ते सुहास बेंगळे,संजय कांबळे,बाळ कांबळे,प्रकाश कांबळे,मुरलीधर कांबळे,अक्षय रोकडे,प्रवीण वाघमारे, दत्तात्रय वाघमारे,प्रकाश जमदाडे,आप्पा वाघमारे,मिलिंद गायकवाड,दिनेश गायकवाड,दिनकर देवकर,दिलीप देवकर,विजय बापू देवकर,प्रकाश कांबळे,कुशल शिंदे,सोनवणे गुरुजी यासह संयोजक बौद्धजन विकास मंडळाचे सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनील तात्या धिवार म्हणाले की आता तुमच्या गावामध्ये बुद्धांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आलेली आहे. तुमची जबाबदारी वाढलेली आहे भगवान गौतम बुद्ध हे शांततेचा प्रतीक आहे. करुण आणि प्रेम यांचे प्रतीक आहे. मावडीकर ग्रामस्थांसह शिंदे परिवाराने या भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीचे मांगल्य जपले पाहिजे. दर रविवारी विहारांमध्ये येऊन अबाल वृद्धांनी त्रिशरण आणि पंचशील ग्रहण केले पाहिजे.

## पनवेल महानगरपालिकेला सवाल :- मध्ये मध्ये तोंड घालायला कुणी सांगितला - दिबा पाटील सर्वपक्षीय कृती समिती

महाराष्ट्र जीत

**अविनाश जाधव वार्ताहर**

**कळंबोली पनवेल (प्रतिनिधी) :-** नवी मुंबई येथील नवीन झालेले आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिले टेकऑफ सप्टेंबरमध्ये होईल, असे सांगण्यात येते आहे. विमानतळाचे महिनाभरात उद्घाटन होणार असल्याने विमानतळावरील उर्वरीत कामाची प्रचंड लगबग सुरू असल्याचे दिसत आहे. या विमानतळाचा उल्लेख आजही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि त्याच नावाची कंपनी आहे. मात्र, अनेक वर्षांपासून या विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी होत असताना आणि केंद्र





सरकार सकारात्मक असताना पनवेल महापालिकेने लावलेल्या नव्या दिशादर्शक फलकावरून स्थानिक संतप्त झाले आहेत. हा आगाऊपणा करायला कुणी सांगितला, असा संतप्त सवाल दिबा पाटील सर्वपक्षीय कृती समितीने केला आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी खूप जुनी आहे. त्यासाठी महाविकास आघाडीने राज्याचा प्रस्ताव मंजूर करून केंद्राकडे पाठवला होता. महाविकास आघाडीचे सरकार गेल्यानंतर महायुती सरकारनेही विधिमंडळात प्रस्ताव मंजूर करून केंद्राला पाठवला होता. विमानतळाला दिबांचेच नाव देणार, हे सरकार वारंवार सांगत आहे. मात्र, तीन वर्षे झाली तरी सरकार तशी अधिसूचना काढत नसल्याने दिबा पाटील सर्वपक्षीय कृती समितीने अनेकदा नाराजी व्यक्त केली आहे. असे असताना ही पनवेल महापालिकेने दिशादर्शक फलक लावल्याने आगीत तेल टाकण्याचे काम केले आहे. विमानतळाला दि.बा. पाटील यांच्या नावाचे नोटिफिकेशन निघालेले नसताना पनवेल महापालिकेने दिशाभूल करून चोंबडेपणा करू नये, असे खडेबोल कॉ. भूषण पाटील यांनी सुनावले आहेत. ते दिबा पाटील सर्वपक्षीय कृती समितीचे सरचिटणीस आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्थानिक आणि प्रकल्पग्रस्तांनी लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची आग्रही मागणी केली आहे. त्यासाठी त्यांनी अनेकदा आंदोलने केली आहेत. तसेच नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू आणि विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची दिल्लीत भेटदेखील घेतली होती. त्यावेळी विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी सरकार सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले होते. तसेच राज्यमंत्री मोहोळ यांनी त्यानंतरही अनेकदा दिबांचेच नाव देणार असल्याचे सांगितले होते. याबाबत अजून केंद्र सरकारने अधिसूचना काढली नाही. असे असताना पनवेल महापालिकेने दिशादर्शक फलकावर नवी मुंबई विमानतळ असे नमूद केल्यामुळे दिबा पाटील सर्वपक्षीय कृती समिती संतप्त झाली आहे.

## वाढा फॉर्म ते पिंपळखुटा पाणंद रस्त्याची दुरावस्था...

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत... तालुका प्रतिनिधी... मंगरूळपीर...**

**मंगरूळपीर :** तालुक्यातील वाडा फार्म ते पिंपळखुटा शेत शिवार अंतर्गत असलेल्या वाहिवाटीच्या पाणंद रस्त्याची पावसाळ्यात अत्यंत वाईट दुरावस्था झालेली आहे. त्यामुळे सदरील रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.



सविस्तर वृत्त असे की वाढा फार्म शेतशिवारात शेती असलेल्या चांभई ,पिंपळखुटा येथील शेतकरी यांना वहीवाटीसाठी शेतात जाण्यासाठी जूना रस्ता हाच एकमेव मार्ग आहे. या रस्त्याने एक दोन एक नाला आहे. नाल्या लगत असलेल्या रस्त्यावर मोठे खड्डे पडून पावसाने रस्त्यावर चिखल झाला आहे. एक पाय टाका दुसरा काढा असा फसण्याचा रस्ता झाला आहे.

त्यामुळे या रस्त्याने जाने अत्यंत जिकरीचे झाले आहे. शेतकऱ्यांना खते घेऊन जाणे व शेतातून शेती साहित्य आणणे करीता एकमेव पांदन रस्ता आहे, मात्र हाच रस्ता अत्यंत वाईट अवस्थेत आहेत. एकीकडे शासन समृद्धी महामार्गासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करत आहे. तर दुसरीकडे शेतकऱ्यांना पांदन रस्ते करून देण्यास शासन उदासीन आहे. तेव्हा शेतकऱ्यां ना शेती वहीवाटीसाठी शेतात सुलभतेने जाण्या येण्यासाठी सदर रस्ता जाण्या येण्यास तसेच बैलबंडी, ट्रॅक्टर नेण्या योग्य तरी करून देण्यात यावा, अशी मागणी ग्राम वाडा फार्म शेत शिवारातील शेतकरी भीमराव भगत, भारत भगत, जावेद खान , नाजीर खान ,सलीम खान, वंदना भगत ,दीपक मुंढरे, रवी मुंढरे, शेख नईम, अर्जुन शिंदे,या शेतकऱ्यांनी लवकरात लवकर पांदण रस्ता करून देण्याचे मागणी केली आहे .

## भाजपा कारंजा तालुका व शहर कार्यकारिणी जाहीर

महाराष्ट्र जीत

**कारंजा (प्रतिनिधी)** – दि. 12 ऑगस्ट, मंगळवार रोजी दुपारी 1 वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात भाजपा तालुका मंडळ, कामरगाव मंडळ आणि कारंजा शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. बैठकीचे अध्यक्षस्थान आमदार सौ. सईताई डहाके यांनी भूषविले. प्रमुख उपस्थितीमध्ये भाजपा वाशिम जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, जिल्हा सरचिटणीस डॉ. राजीव काळे, जेष्ठ नेते नरेंद्र गोलेच्छा, जिल्हा उपाध्यक्षा सौ. सविता काळे, म.प्र. कार्यकारिणी सदस्य विजय काळे, निरंजन करडे, तालुका अध्यक्ष अमोल ठाकरे, कामरगाव मंडळ अध्यक्ष संजय लाहे आणि शहर अध्यक्ष सौ. प्राजक्ता माहीतकर यांचा समावेश होता. कार्यक्रमाची सुरुवात भारतमातेचे आणि पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून झाली. यावेळी आमदार डहाके म्हणाल्या की, "भाजपा पक्ष हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. येथे कोणी लहान–मोठा नसून प्रत्येक कार्यकर्ता पक्षाचा प्रमुख आहे. कार्यकर्ता मोठा झाला की पक्ष मोठा होतो. माझी गरज जिथे भासेल तिथे मला निःसंकोचपणे हाक द्या. पक्षातील प्रत्येक कार्यकर्ता हा भाजपा परिवाराचा अविभाज्य घटक आहे." यानंतर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. त्यामध्ये कारंजा तालुका ग्रामीण मंडळ सरचिटणीस – मयुर लळे, प्रशांत चौधरी उपाध्यक्ष – राजु खोड, गजानन ढोकने, संजय घुले, निखील काळे, सौ. सुनिता ढोले, राजेश गाढवे चिटणीस – संदीप तोडासे, सौ. प्रज्ञा मनवर, केशव जाधव, चंद्रकीरण भिंगारे, अमोल डांगे, रामेश्वर वंड कोषाध्यक्ष – नितीन उपाध्ये






कारंजा कामरगाव ग्रामीण मंडळ सरचिटणीस – नरेंद्र पायघण, उमेश ठाकरे, उपाध्यक्ष शांताराम पवार, उमेश भोजने, आशिष तुरक, सुनिल ठाकरे, संदीप शिवहरे, सौ. रंजना गालफाडे चिटणीस – मनिष राठोड, सुरेंद्र हीरडे, ज्ञानेश्वर करडे, सौ. अनुसया जाधव कोषाध्यक्ष – राजेंद्र अघम कारंजा शहर मंडळ सरचिटणीस – संदीप काळे, प्रसन्ना पळसकर उपाध्यक्ष – अविनाश फुलउंबरकर, संतोष धोंगडे, राजु पाटील मोरे, हरीष मनुजा, सौ. शुभांगी कौडण्य, सौ. चंदाताई कोळकर चिटणीस – सौ. पल्लवी डेडुंळे, अक्षय श्रीराव, अक्षय जोशी, अमोल अघम, तेजस उखळकर, राजु ढोके कोषाध्यक्ष – प्रभाकर घोडसाळ सोशल मीडिया प्रमुख – आदर्श उटाळे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसन्ना पळसकर यांनी केले तर आभार प्रदर्शन संदीप काळे यांनी मानले.

## परिक्रमा यात्रेनिमित्त श्री.आनंद दत्तधाम आश्रमात हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ...

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे**
**माहूर तालुका प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणेच याही वर्षी श्रावण मासा निमित्य माहूर गड परिक्रमे निमित्त श्री. आनंद दत्त धाम आश्रम जे अन्नदानामध्ये सुप्रसिद्ध असलेला मठ आहे येथे भाविक भक्तगण मंडळींना अन्नदानाचे पवित्र कार्य पार पाडण्यात आले.तेव्हा परिक्रमाच्या दोन दिवसीय माहूर मध्ये झालेल्या भाविकांची गर्दी आनंद दत्तधाम आश्रमात जाणवली आहे.काही महिन्यापूर्वीच मंत्री महोदया मेघना दीदी बोर्डीकर साकोरे यांनी सुद्धा या महाप्रसादाचा आनंद घेतला हे विशेष.



नेहमीच आनंद दत्त धाम आश्रमात नियमित अन्नछत्र चालवले जाते.माहूर सारख्या धार्मिक तीर्थक्षेत्र असलेल्या ठिकाणी श्री.आनंद दत्त धाम आश्रमाक अन्नदान व अनेक समाज सेवा प्रणित उपक्रम मठाचे मठाधिपती राष्ट्रसंत द.भ.प.साईनाथ महाराज वसमतकर जे महाराष्ट्र राज्याचे स्वच्छतादूत म्हणजेच ब्रॅण्ड अम्बेसिटर आहेत ते व अनुयायी मिळून चालवत आहेत. प्रवाशी व भक्तगण यांना दत्त नामाचा अन्नाचा प्रसाद याठिकाणी मिळतो.

गरिबांना आणि गरजूंना अन्न उपलब्ध करून देणे,प्रवाशांना जेवणाची सोय करून देणे,अन्नदाना सारख्या धार्मिक व सामाजिक कार्यास प्रोत्साहन देणे,समाजात अन्न सुरक्षा व समता निर्माण करणे याच उद्देशाने सामाजिक बांधिलकी व धार्मिक परंपरेतून माहूर चे श्री.आनंद दत्तधाम आश्रम व मठाधिपती राष्ट्रसंत द.भ.प.साईनाथ महाराज वसमतकर यांच्याकडून भाविकांना यात्रेनिमित्त महाप्रसाद व नियमित अन्नछत्र अविरत चालवले जाते.

भाविकांना ते आपल्या प्रवचन व कीर्तनातून दत्तधाम व सामाजिक बांधिलकीतून स्विकारलेली सप्तसुत्रीस स्वीकारण्यास अवाहन करतात. यासाठी सहकार्य आश्रमाचे प्रवक्ते भाऊराव पाटील हडसणीकर, जवाहरलाल जयस्वाल, शेषराव पाटील,पुंडलिक हुम्बे सावकार , नथ्थु पाटील, संतोष मते, वैभव खराटे, सुधीर जाधव यांनी सहकार्य केले.

## शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचा (शरद पवार गट) आज भंडाऱ्यात धडक मोर्चा.

### विविध २३ मागण्यांसाठी शासनाला देणार निवेदन; अन्यायग्रस्त शेतकरी संघर्ष समितीचाही पाठिंबा.

महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा.**

भंडारा, : राज्य शासनाच्या धोरणांविरोधात आणि शेतकरी, शेतमजूर, महिला व सर्वसामान्य नागरिकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) तर्फे आज, दिनांक १३ ऑगस्ट रोजी भंडारा शहरात भव्य 'धडक मोर्चा' काढण्यात येणार आहे. हुतात्मा स्मारक, शास्त्री चौक येथून सुरू होणारा हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार असून, शासनाचे लक्ष वेधण्यासाठी २३ प्रमुख मागण्यांचे निवेदन सादर केले जाणार आहे. या मोर्चाचे नेतृत्व पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, आमदार रोहित पवार, आमदार जितेंद्र आव्हाड आणि माजी आरोग्यमंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे हे करणार आहेत. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मोर्चा निघणार असल्याची माहिती पक्षाचे माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष चरणभाऊ वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या आहेत प्रमुख मागण्या:

या मोर्चाद्वारे शासनाकडे अनेक महत्त्वाच्या



मागण्या केल्या जाणार आहेत, त्यापैकी काही प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे: शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करावा. खरीप व रब्बी हंगामातील धान पिकाचे थकित चुकारे आणि बोनस त्वरित अदा करावा. कृषीपंपांना दिवसा १६ तास वीजपुरवठा करावा आणि स्मार्ट मीटरची सक्ती रद्द करावी. "लाडकी बहिण" योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना दरमहा रु. २१००/– देण्यात यावेत. शहर व ग्रामीण भागातील खड्डेमय रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करून पाणीपुरवठा सुरळीत करावा. श्रावणबाळ, संजय गांधी निराधार योजनेचे थकित मानधन तात्काळ द्यावे. वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या शेतीच्या नुकसानीची भरपाई द्यावी. सहारा इंडियासारख्या बुडीत संस्थांमधील ठेवीदारांना त्यांच्या रकमा परत मिळवून द्याव्यात. घरकुल योजनेतील बोगस लाभार्थी आणि रेती तस्करी करणाऱ्यांची चौकशी करावी.

अन्यायग्रस्त शेतकरी संघर्ष समितीचा पाठिंबा

गेली सात वर्षे शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर, जसे की जंगली जनावरांपासून होणारे नुकसान, पूरग्रस्त मदत, धान पिकाचे चुकारे आणि कर्जमुक्तीसाठी सातत्याने आंदोलने करणाऱ्या अन्यायग्रस्त शेतकरी संघर्ष समितीनेही या मोर्चाला जाहीर पाठिंबा दिला आहे. समितीचे अध्यक्ष चरणभाऊ वाघमारे यांनी सांगितले की, "शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी शरद पवारांच्या नेतृत्वात निघणाऱ्या या मोर्चात आम्ही पूर्ण ताकदीने उतरणार आहोत." समितीने जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. हा मोर्चा हुतात्मा स्मारक, शास्त्री चौक, महात्मा गांधी चौक, पोस्ट ऑफिस चौक, मुस्लीम लायब्ररी चौक मार्गे त्रिमूर्ती चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचेल. मोर्चाच्या शेवटी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात येणार आहे. भंडारा जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कामगार आणि युवकांनी स्वयंस्फूर्तीने मोर्चात सहभागी होऊन तो यशस्वी करावा, असे आवाहन प्रेस च्या माध्यमातून चरणभाऊ वाघमारे यांनी केले आहे. त्या वेळी जिल्हाध्यक्ष चरण भाऊ वाघमारे, सेवादल जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर भिवगडे, जिल्हा सचिव अजय मेश्राम, भंडारा शहर अध्यक्ष मधुकर चौधरी, भंडारा तालुका अध्यक्ष देशमुख , कार्याध्यक्ष भंडारा तालुका रवींद्र तिडके, शहर पदाधिकारी करमचंद वैरागडे प्रेस ला उपस्थित होते.

## उमेद अभियान अंतर्गत जि.प.समोरील बचत गटाच्या स्टॉलला कीरण कोवे यांची भेट.

महाराष्ट्र जीत

**वाशीम(प्रविण पट्टेबहादुर)** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत वाशीम जिल्हा परिषद समोर दि.१२ ऑगस्ट २५ रोजी उमेदच्या अडोळी प्रभागाच्या पंचशील महीला बचत गटाच्या वतीने आशा कांबळे व रिसोड तालुक्यातील दिव्या शक्ती बचतगट जांब आढाव ,स्वामी समर्थ चिखली खुर्द बचत गटाच्या शितल सुर्वे आणि श्री साईबाबा बचतगट कामठवाडा येथील महीला समुहाचे वतीने वेगवेगळ्या प्रकारचे उत्पादीत केलेल्या पदार्थ,हस्तकला,व विविध प्रकारचे प्रोडक्श विक्री व प्रदर्शन साठी ठेवण्यात आले होते.या स्टॉलला प्रकल्प संचालक कीरण कोवे, गटलेवार साहेब यांनी दि.१२ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता भेट देऊन पाहणी केली.यावेळी त्यांचे समवेत उमेदचे अधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते राजकुमार पडघान, आकाशवाणी चे सुनिल कांबळे, सम्राट टाइम्सचे मुख्य संपादक विनोद तायडे,अरूण शेळके पाटील, गजानन देशमुख यांनी देखील भेट देऊन वस्तू खरेदी केल्या आहेत.यावेळी उमेदच्या शितल सुर्वे यांनी सांगितले की,उमेद मुळे महीलांना छोटे छोटे उद्योग करण्यास संधी मिळत असून महीलांना यामधून अर्थ सहाय्य देखील मिळत आहे.तर



उमेदचे प्रकल्प संचालक कीरण कोवे यांनी बोलताना सांगितले की, महाराष्ट्र शासनाने हा उपक्रम महीलांना स्वावलंबी बनवून आर्थिक बळकटीसाठी मदत करणे व यामधून रोजगार मिळतो.त्यामुळे महीला ही सक्षम बनते.प्रसंगी विनोद तायडे, सुनिल कांबळे व राजकुमार पडघान यांनी उमेदीच्या उपक्रमाचे कौतुक केले आहे.